॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. समन्वय/उ.प.२०२६/२०२५-२६/८७५४ दिनांक : ०२/०४/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: महाराष्ट्र शासनाच्या विविध MHCET-2026 परीक्षा देणा-या उमेदवारांच्या विद्यापीठ परीक्षेच्या नियोजनाबाबत
संदर्भ: १) विद्यार्थी संघटनेचे निवेदन व विद्यार्थ्यांचे विनंती अर्ज.
२) दिनांक २/४/२०२६ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ठराव.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२६ च्या परीक्षा दिनांक १ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेल्या आहेत. तथापि, महाराष्ट्र शासनाच्या MHCET-2026 परीक्षा व विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमातील काही विषयांच्या परीक्षा एकाच दिवशी येत असल्यामूळे सदर परीक्षा पुढे ढकलण्याबाबत विविध विद्यार्थी संघटनांनी व विद्यार्थ्यांनी निवेदनाव्दारे विनंती केलेली आहे.

प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा पुढे ढकलल्यास पदवी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्याचे निकाल लागण्यास विलंब होऊन त्यांच्या भविष्यातील संधीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दिनांक ०२/०४/२०२६ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे MHCET-2026 च्या परीक्षेस आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांनी नियोजीत MHCET-2026 च्या परीक्षा द्याव्यात व सदर परीक्षा झाल्यानंतर MHCET-2026 परीक्षेचे प्रवेश पत्र व परीक्षा दिल्याचा पुरावा (उपस्थिती अहवाल) महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत विद्यापीठात दिनांक १८/०४/२०२६ पर्यंत सादर करावे. अशा विद्यार्थ्यांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा विद्यापीठ मुख्य परिसर व उपकेंद्र लातूर, परभणी व न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली येथे सुधारीत वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहिर करून घेण्यात येतील.

सबब, उपरोक्त माहिती संबंधी विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावरून देण्यात यावी ही विनंती.

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव:
मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
मा.प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ